# आत्महत्या

चंद्रकुमार नलगे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B144

प्रमुख वितरक

अजब डिस्ट्रिब्युटर्स

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर

**आत्महत्या : चंद्रकुमार नलगे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १४०/-

प्रेमळ जावई
प्रा. डॉ. दीपकराव चव्हाण,
सौ. शांताबाई दीपकराव चव्हाण,
नाती कु. प्राची,
कु. तृप्ती
यांच्या लोभसपणास

# अनुक्रमणिका


१ आत्महत्या ........................................ ७

२ परका ................................................. २१

३ सांजसावल्या .......................................... ३२

४ एक घर काळोखाचं .................................. ४४

५ निळं आभाळ... लाल ठिपका... .................... ५५

६ कुणाचं ओझं कुणाच्या खांद्यावर ! .................... ६८

७ परी ................................................... ७६

८ गंडा .................................................. ८७

९ इभ्रत .................................................. ९७

१० हुमान ................................................ १०८

११ फाकडू ............................................... १२१

१२ खबऱ्या .............................................. १३३


✧✧

१

# आत्महत्या



त्याचं नाव तसं चिंतू. लहान होता तेव्हा पोरंबाळं चिंत्या म्हणत. पुढं गल्लीतील माणसं चिंतोबा म्हणू लागली, चिंतोबाचं लग्न झाल्यावर बोळाटोळातील लहान पोरं चिंतूअण्णा म्हणू लागली. चिंतूअण्णा इथवर नामकरण पोचलं. तेच नाव चिंतुन्ना असं वाखाणलं जाऊ लागलं. चिंतुन्ना तसा साधाभादा माणूस. पूर्वीचं भलं घराणं. पण पिढ्या बदलू लागल्या. चिंतुन्नाच्या पिढीपर्यंत एक-दोन एकरापर्यंत जमिनीची तुकडी उरली. कसं तरी पोटपाणी चाले. दोघं भाऊ भाऊ. एक चिंतुन्ना आणि दुसरा विठोबा. चिंतुन्ना शेतीभाती करी. एकट्याला राबायला जमीन पुरी पडंना म्हणून विठोबा धरणाच्या कामावर जाऊ लागला.

धरणाचं काम जोरात चाललेलं. मोठमोठी अवजारं डोंगर फोडीत. खोदलेली दगडमाती डंपरमध्ये भरीत. धरणबांधावर आणून टाकीत. अशाच एका डंपरवर विठोबा कामावर होता. डंपर भरता भरता वरून खोदलेला डोगंराचा कडा कोसळला. त्याखाली तीन-चार कामगार सापडले. त्यात विठोबा एक. जगलावाचला; पण पाय कमरेतनं अधू झालेलं. तसाच जलम त्याच्या वाट्याला. आणि चिंतुन्नाच्या वाट्याला असा मोडकातोडका विठोबा. बिनलग्नाचं जिणं

वाट्याला आलेला विठोबा घराला तसा भारच होता. पण चिंतुन्नानं कधीच कुरकुर केली नाही.

चिंतुन्नाला राबणं एवढंच माहिती. दीड-दोन एकर जमीन. घरचं सगळं कुटुंब चालणं कठीण. पोटाला आलेली तीन पोरं. आपण नवरा-बायको आणि विठोबाचं लोढणं एक. पाच-सहा माणसांचं पोटपाणी चालवायचं म्हणजे जीव मेटाकुटीला आलेला. मिळाली तर कुणाची तरी जमीन खंडाभागानं करायची. त्यात राबायचं. जमलं तर गाठी बांधायचं दोन पैसं. घरात नसलं तर कधी दुसऱ्याच्या दारात उभा राहिला नाही. बायको कोयनाही तशीच. जिवाटीनं संसार करी. चिंतुन्ना आपल्या बायकोचं नाव कोयना असलं तरी आवडीनं कुई म्हणे. बाकी माणसंही तिला कुई म्हणूनच हाक मारीत. चिंतुन्ना आणि कुईच्या संसाराला धरणाच्या पाण्यानं हातभार लावला. दीड-दोन एकर जमीन पाण्याखाली आली. उसानं हात दिला. भाजीपाला पिकवीत. कुई भाजीपाला घेऊन बाजारात बसू लागली.

घर बरं चाललं होतं. चिंतुन्नाचा विठोबावर भारी जीव. नदीला धरणाचं पाणी आलं तेव्हा त्या पाण्यावर केवढा राग. नदीच्या काठावर उभा राहिला आणि नव्या आलेल्या पहिल्याच धरणपाण्याला म्हणाला,

''तू माझं घर मोडलसं. इठुबा धड असता तर घराला बळ मिळालं असतं. माझ्या इठुबानं काय केलं हुतं तुझं? त्यो माजोरी न्हवता. कवाच तसा न्हवता. भाबडा माझा इठुबा. पर त्वा त्येला जलमाचा आधू केलास. माझा हिंडता फिरता गडी. मोडून पाडलंस घर. तुझं त्वांड बघितलं नसतं. पर आमचं जिणंच तुझ्यावर.''

इतर वेळी नदीच्या पाण्यात खळाखळा हातपाय धुणारा चिंतुन्ना. पण त्यानं वरच्या धरणातून आलेल्या पाण्याला मनापासून आपलं म्हटलं नाही. पहिल्यांदाच धरणातून पाणी सोडलं तेव्हां सगळीकडं ती वार्ता पसरली. नदी काठाकाठानं माणसांची ही मोठी गर्दी. लोक पाणी बघायला आतूर झालेलं. चिंतुन्ना गप्पगुमान घरात बसला. स्वत:च्या भावाच्या दुबळ्या पायांना बघत तडफडत राहिला. विठोबाला राहवंना. तो चिंतुन्नाला म्हणाला,

''आन्ना...''

''जी...''



''नदीला पाणी येणार हाय म्हणं...''

''...''चिंतुन्ना गप्पच.

''माणसं...गाववालं धरणाचं पाणी बघायला गेल्यात म्हणं...''

''...''चिंतुन्ना गप्पच.

''गाडी जुपली आसतीस...''

चिंतुन्नाला राग आनावर झाला. गुडघ्याची मिठी सोडून तावदारला,

''कशाला रं...?''

''धरणाचं पाणी बघायला नेलं असतं.''

परत रागानं चिंतुन्ना म्हणाला,

''ती काय खंडुबाची जत्रा हाय का? का कोंडाबायची जत्रा हाय? आँऽऽ गप बसवंना?''

''सगळा भाग लोटलाय म्हणत्यात पाणी बघायला.''

'' जीव द्याला भडवी पळत्यात. पळू देत. तुला काय करायचं? गप्प बसवंना? झालं तेवढं पुरं झालं न्हाई? त्या धरणानंच तुला असा मोडून पाडलाय. इसारलास? तू इसारला आसशील. म्या न्हाई इसारलू.''

विठोबा गप्प झाला.

असा चिंतुन्ना. त्याला कसलीच आगळीक सोसवत नसे. आपण सरळ माणूस. जगानंही सरळ असावं असा त्याचा सरळ हिशेब. जेवढं कष्ट करता येईल तेवढं करावं. दोन घास गुण्यागोविंदानं खावं असं त्याचं मन. कुणाच्या ना अध्यात ना मध्यात. विठोबाचं लग्न करावं असं त्याला लाख वाटे. पण मोडून पडलेल्या माणसाला कोण देणार पोरगी? पै पाव्हण्यांनी काय बघून पोरगी द्यावी? चिंतुन्नाला फार वाईट वाटे. तो हिंड हिंड हिंडला. गावं धुंडला. तो मुलीच्या बापाला म्हणायचा,

''माझा इठू म्हंजी सोन्यासारखा. त्येचा दैवानं घात केला. हे धराण त्येच्या जीवावर उठलं. आसलं धा डोंगूर त्येनं फोडलं आसतं. पर घात केला या धरणानं. कुणी पोरगी दिली तर म्या सांभाळीन. फुलासारखी जपीन. माझा जीव गहाण ठेवीन. त्या दोघांस्नी सांभाळीन. इश्वास ठेवा. पर माझा इठुबा हाळदीनं भाजून निघूद्या...''

चिंतुन्नाच्या या बोलावर कुणी कसा विश्वास ठेवावा. बाई माणसाला नवरा धड तर सारं जग धड. चिंतुन्ना तळमळत राही. मनात म्हणे,

''देवा, माझ्या इठुबाच्या नरक नकं रं कपाळाला...''

ही रुखरुख काळजात सांभाळीत चिंतुन्ना सहा माणसांच्या पोटापाण्यासाठी राबू लागला. खाणारी तोंडं मोठी होऊ लागली होती. मुलांना शिकवायला हवं. चिंतुन्नाला वाटे, ''आपून अडाणी. इठुबाही तसाच. म्हणून असं ऱ्हायलू. पोरांना शिकवायला पायजेल. जग बदाललंय. शिकलं तरच तरलं. पोरांना चार आक्षरं आली तर कायबी करतील. कुठंबी पोटं भरतील. रीण काढून का हुईना पोरास्नी साळंत धाडायचं.''

चिंतुन्ना मोठा करारी माणूस. त्यानं कष्टाला जुंपून घेतलं. तिन्ही पोरांना शाळंत घातलं. त्यांचा कपडालत्ता, वह्या-पुस्तकं घ्यायची म्हणजे पैशाचा खेळ. पैशाचं सोंग काढता येत नाही. कुईही समजूतदार होती. ती राबायला मागं राहात नसे. आपल्या शेतीभातीतली कामं आटोपली की लोकांच्यात रोजगारानं जाई. विठोबाला सांभाळी. कितीही खडतर जिणं वाट्याला आलं तरी तिनं विठुबाचा दुस्वास कधी केला नाही. दिराला पोटच्या पोरापरीस जपत राही. विठोबाला त्यांचं राबणं बघून अवघड वाटे. घोगऱ्या आवाजात म्हणे,

''वैनी किती राबशीला. तुमचं कष्ट बघवंना मला. मला आर्धीच भाकरी देत जावा.''

''का ? काय झालं ?''

''न्हाई म्हंजी म्या आसं लोळून खायचं. तुम्ही दोघांनी राबायचं ?''

''मग टाकलंय काय तुम्हास्नी आमी ?''

''न्हाई... पर...''

''तुम्ही पोटचं पोर आसतासा म्हंजी आमी ढकललं असतं काय ?''

''न्हाई... पर...''

''न्हाई न्हवं. गुमान खायाचं. तुमी का बळंना काम करीत न्हाईसा काय ? ह्या देवांचा मढं बसीवलं. त्येनं तुम्हाला आसं करून ठेवलंय. तुमचा काय दोष ? पुन्ना आसं बोलायचं न्हाई. मिळंल त्यो तीळ वाटून खाऊ. आमच्या धडात जीव हाय तंवर आता कसलाच सबूद काढायचा न्हाई. घर सांभाळताय ते थोडं झालं का ? तेबी कामच हाय की...''

विठोबाच्या डोळ्यात पाणी उभा राहिलं. त्याच्या मनात नाना विचार येत...

''दुसऱ्याच्या जीवावर किती दिवस तुकडं गिळायचं. भावानं राबायचं. गरीब गाय असलेल्या भावजयीनं काबाडकष्ट करायचं. आपण असं आयतं बसून त्येचं



कष्ट बघायचं. त्यापरीस मेल्यालं काय वाईट ? तेच खरं. काय तरी खावं नि जावं मरून. घराला भार कशासाठी ? पण आसं आपून केलं तर दादाला काय वाटेल ? कुई वैनीला धक्का बसंल. खचून जातील ? दादा हळवा हाय.''

विठोबा तसाच जगत राही. खुरडत चालणं. खुरडत जगणं.

एक दिवस चिंतुन्ना दुपारचाच घरी आला. कुई रानात भांगलणीत गुंतली होती. असा चिंतुन्ना अचानक घरी आलेला पाहून विठोबानं विचारलं,

''आसं मधीच आलास दादा...?''

''एक वाटंचा वाटसरू जात होता. छपरात पाणी प्याला आलाता. त्येनं सांगितलं...''

''काय सांगितलं...?''

''तुझ्या कमरंला इलाज करायला.''

''कसला ?''

''झाडावरची वाघळ मारून तिचं तेल काढायचं. चालायला यील म्हणीत हुता.''

''त्येला कुणी सांगितलं माझ्या दुखण्याचं ?''

''म्याच की...!''

''किती करशील काळजी माझी. माप पैसं घालून दमलास आता. हे आणि कशाला घेतलंयास डोस्क्यात. आणिक ती वाघूळ मिळायची कुठं ?''

''कोकरूडच्या रानात हाय म्हणं. बघतू मिळतीय का.''

चिंतुन्ना लगबग करून निघाला. त्यानं कोकरूडचं रान गाठलं. बघतोय तर एका उंच आंब्याच्या झाडाला वाघळा. उलटं लटकणारं ते काळं भंगर जग बघून चिंतुन्नानं नि:श्वास टाकला. गोफणीनं भिरीरा दगडं मारली. हात दमलं. बोटांना रग लागली. शेवटी जीवाच्या करारानं जोरात टिपिरा दिला. एक वाघळ फडफडत खाली आली. पण मध्यावरच एका फांदीला अडकली. चिंतुन्ना तसाच वर चढला. फांदीच्या टोकला अडकलेल्या वाघळीला ओलकांबला. घ्यायला गेला नि ती फांदीच मोडली. चिंतुन्ना कोसळला. त्याच्या गुडघ्याला मार बसला. चांगलं दोन-तीन महिनं अंथरुण धरलं. कोल्हापूर सरकारी दवाखान्यात ऑपरेशन करावं लागलं. हातात पैसा नव्हता. सोसायटीचं कर्ज काढलं नि बिल भागवलं. कर्जाला, उसण्या-पासण्याला भिणारा चिंतुन्ना, पण

तोच कर्जात रुतला. या दुखण्याच्या कळा त्यानं सोसल्या. पण काढलेल्या रिणाच्या यातना त्याचा जीव कोंडून टाकीत होत्या.

कुईनं खस्ता खाल्ल्या. कोसळल्या डोंगराला डुई द्यायचा प्रयत्न करीत होती. नवरा असा. दीर तो तसा. पोरं शाळा शिकणारी. कोंड्याचा मांडा करीत ती दिवस ढकलीत होती. तिला आशा होती, मुलं शिकतील. मोठी होतील. घर उजळून निघंल. पोरं कामधंद्याला लागली की हे बी दिस जातील. काळ बदलंल. सुख नांदंल.

चिंतुन्ना हळूहळू बरा झाला. त्याच्या मनावरची खपली निघाली. नेटानं कामाला लागला. दुखण्याचं रीण फेडण्यासाठी राबराब राबला. काढलेल्या रिणाचं ओझं कमी झालं तसा चिंतुन्ना मोकळाढाकळा बनला. त्याच्या जीवाला बरं वाटलं. आता त्याचा एकच ध्यास होता, वरच्या गल्लीतल्या धोंडीनानाचं - गरिबाचं पोरगं शिकलं. बी.एड. का काय झालं, मास्तर झालं. दिस उजाडलं त्येचं. आपुणबी पोरास्नी शिकवायचं. जीव पणाला लावायचा. काळ हाटंलच की कवा तरी ?

चिंतुन्ना राबत होता. झिजत होता. कुईही काही कमी नव्हती. तिनं तर आपलं नशीब नवऱ्याच्या कपाळासंग बांधलेलं. आपण उपाशी-तापाशी राहायची. पोरांना शिकवायची. थोरला राम. त्याला घरच्या ओढाताणीची जाणीव होती. तो काटकसरीनं वागे. चिकाटीनं अभ्यास करी. वह्या पुस्तकाला वगैरे खर्च करताना दोन पैसंसुद्धा त्याला डोंगराएवढं वाटत. तो कसा तरी आठ-दहा मैलाच्या कॉलेजला जाई. घरी आल्यावर रोजगाराच्या कामावर जाई. घराला मदत करी. दुसरा किसना. तोही तसाच. एकटेपणानं वागे. मित्रमंडळी जोडली तर कसलीही थेरं लागतील, ती आपल्याला झेपणारी नाहीत म्हणून साऱ्यांपासून दूर राही. त्यानंही दहावीपर्यंतचं शिक्षण पुरं केलं होतं. त्यानं घराचं दैन्य बघितलं आणि चिंतुन्ना नको म्हणत असता शिक्षण सोडलं. एकट्याला रामलाच तेवढं भरपूर शिकवूया. त्याला नोकरी लागली की आपसूकच घर सुधरंल असा त्याचा कयास होता. तो लाकूड कापण्याच्या गिरणीत (सॉ मशीन) कामाला राहिला.

धाकटी वैजू. तीही समजदार होती. घरातली धुणीपाणी, भांडीकुंडी बघी. चूल पेटवी. दहावीच्या परीक्षेला बसणार होती.

एक स्वप्न उराशी कवटाळून हे कौलारू घर तगत होतं.



राम बी.ए. झाला. घरादाराला केवढा आनंद झाला. कुईनं लेकाला पोटाशी कवटाळलं. झराझरा आनंदाश्रू ढाळलं. बापाला चिंतुन्नाला सगळं आभाळ जिंकल्यासारखं झालं. किसनानं भावाला मिठ्ठी मारली. बहीण वैजू थोरल्या भावाच्या पाया पडली. घरभर सारा आनंदी आनंदच. आनंदाचा भर ओसरल्यावर चिंतुन्ना म्हणाला,

''आगं पोरावरनं दहीभात उतरून टाक कुई.''

गमतीनं कुई म्हणाली, ''आवं, पोरावरनं दहीभात कशाला जीवच ओवाळून टाकते की.''

कुईनं लेकराचा अलाबला घेतला आणि आपल्या कानशिलावर कडाडा बोटं मोडली.

सारं अपरूप अपरूप वाटत होतं. विठोबाला कोण आनंद झाला. म्हणाला,

''केरकचऱ्याच्या ढिगाचाही पांग फिटतू म्हंत्यात ते खरं हाय.''

कुई रामला म्हणाली,

''बास झालं बाबा तुझं शिकणं. आता निबत न्हाई आमाला. तू आपला एकादी नोकरी बघ.

रामला माहिती होतं. आता कुठं फिर फिर फिरलं तरी नोकरी लागत नाही. कुठं सोसायटीत नाही तर कारखान्यात असली तर तिथं वशिला दांडगा लागतो. तिथलं पुढारी आपली, आपल्या नात्यागोत्यातली पोरंच भरतात. कारखान्यासाठनं सारं जग राबतं. पण सारा मामला पुढाऱ्याच्या हातात. आपलं गरिबाचं हात कुठं पोचायचं तिथपर्यंत. तरीही तो आईच्या इच्छेखातर कुठल्या चेअरमनला भेटला. तालुक्याच्या पुढाऱ्याला भेटला. आमदाराला भेटला. खासदारापर्यंत त्याची पावलं पोचणारी नव्हती. तरी छोट्यामोठ्या गावठी पुढाऱ्यांना भेटून पाहिलं. पण साध्या शब्दानंही कुणी दखल घेतली नाही. आपल्या आईला - कुईला त्यानं सारं सारं सांगितलं. तिला जगाची जाणीव नव्हती.

चिंतुन्ना, कुई ही भली माणसं. ती हतबुद्ध झाली. शेवटी एक दिवशी राम चिंतुन्नाला म्हणाला,

''मी बी.एड. करतो. मग कुठं तरी नोकरी लागंल.''

''म्हंजी येवढं शिकूनबी उपेग न्हाई ?''

‘‘काळ बदललाय. जो तो आपली माणसं लावतोय. बी.एड. केलं की मुलाखती घेऊन माणसं लावतात. मला मार्क चांगली आहेत. बी.एड. झालं की लागंल कुठं तरी.’’

‘‘तरी पण मी तालुक्याच्या पुढाऱ्याला भेटून बघतू.’’

एकदा चिंतुन्नाच्या उसाच्या गुऱ्हाळावर पुढारी आला होता. तेव्हा चिंतुन्नाचं चांगलं अर्धसं गुळाचं भेल दिलं होतं. उसाचा रस लिंबू घालून पाजला होता. तेव्हा पुढारी निवडणुकीसाठी हिंडत होता. मतं मागीत होता. भूक-तहान लागली म्हणून चिंतुन्नाच्या गुऱ्हाळाजवळ गाडी थांबवली होती. आठ-दहा लोक रस पिऊन ताजीतवानी झाली होती. त्यात पुढाऱ्याची हजेरी होतीच. रस पिऊन तरतरीत झाल्यावर पुढारी म्हणाला होता,

‘‘पाव्हणं, झकास हाय गूळ आणि रसबी. काय नड लागली तर भेटा. आणिक ते मताचंबी बघा. ध्यानात ठेवा. तुमची आठवण चांगली राहणार पाव्हणं. जीवाला आराम मिळाला.’’

चिंतुन्नाला तो प्रसंग आठवला. चिंतुन्नानं त्याच्याच मतावर शिक्का मारला होता. मोठ्या आशेनं भल्या सकाळी पुढाऱ्याच्या दारात उभा राहिला. पुढारी नुकतंच दात घासून चहा पित होते. चिंतुन्नानं नमस्कार केला. बाजूला सरून उभा राहिला. पुढारी चहाचा घोट घेतच आपल्या लहानशा पोराबरोबर गमती करीत राहिला. म्हणत होता.

‘‘आरं ए, कलेक्टरा... पडशील... पडशील. इथं बस. तू कलेक्टर होणार ना. कलेक्टर ? का मंत्री होणार ? मंत्री ? नको तू आपला मुख्यमंत्रीच हो. म्हणजे कलेक्टर तुझ्या हातात... नमस्कार मुख्यमंत्री.’’

त्या पोरानं सवयीप्रमाणं नमस्कार केला. खळखळून हसलं. पुढाऱ्याचं लक्ष नव्हतं म्हणून चिंतुन्ना पुढं होऊन गरीबवाण्या आवाजात म्हणाला,

‘‘सायेब...सायेब...सायेब...’’

दोन-तीनदा सायेब म्हटल्यावर पुढाऱ्यानं लक्ष दिलं आणि म्हणाला,

‘‘काय...?’’

‘‘म्या चिंतुबा. ताडेगावचा. आपून आमच्या गुऱ्हाळावर आला हुता.’’

‘‘बरं. पुढं बोल.’’

‘‘माझं पोरगं जरा शिकलंय. बीये का फिये झालंय.’’



‘‘बरं मग...?’’

‘‘तेला कुठं तरी चिकटवा की...’’

‘‘चिकटवू...?’’

‘‘व्हय जी. उपकार हुतील.’’

‘‘डींक आणलाय का ?’’

‘‘न्हाई. कश्याला जी ?’’

‘‘तुझ्या पोराला चिकटवायला. त्याच्या पाठीला लावतो आणि चिकटवतो कुठं तरी.’’

‘...’ चिंतुन्ना या शब्दांनी अच्यारी का बिच्यारी झाला.

तीन-चार माणसं बसलेली होती. ती चिंतुन्नाकडं बघून हसायला लागली. चिंतुन्ना वरमला.

त्या शब्दांनी त्याला घाम फुटला. पुढारी त्या हसणाऱ्या माणसांकडं बघून उपेक्षेनं म्हणाला,

‘‘ज्यो त्यो उठतोय. माझ्या पोराला चिकटवा म्हणतोय. कुठ चिकटवायचा. आयला बिनलाजी माणसं. आमच्या पोरांचं काय करायचं ते आम्हाला कळंना.’’

एक तुच्छतेची नजर चिंतुन्नावर टाकली आणि पुढाऱ्यानं मान वळवली. त्या रांगत्या पोराच्या खेळण्यात सामील झाला. म्हणत राहिला,

‘‘अहो मुख्यमंत्री, एक छानसा पापा द्या... वा. वा... होणार अं मुख्यमंत्री होणार...’’

चिंतुन्नाला ते वातावरण, पुढाऱ्याचं वागणं अपमानकारक वाटलं. शरमल्या मनानं तो परत फिरला. कुईनं आशेनं विचारलं,

‘‘काय झालं ? कुठं तरी चिकटीवत्यात का ?’’

त्राग्यानं चिंतुन्ना म्हणाला,

‘‘डींक आणा म्हणालाय पुढारी.’’

राम म्हणाला,

‘‘डींक ? कशाला ?’’

‘‘तुला चिकटवायला.’’

रामनं ओळखायचं ते ओळखलं. कपाळाला हात लावीत चिंतुन्ना म्हणाला,

‘‘ठार बिघाडलं जग. काय राम ऱ्हायला न्हाई.’’

रामनं इकडं तिकडं हिंडून बघितलं. नोकरीचं दार जिथं तिथं लागलेलं. त्याला काय करावं कळंना. घराचा अपेक्षाभंग झाला. विठोबा आपल्या निस्तेज डोळ्यानं घरातल्या धीर ढळलेल्या माणसांचं चेहरं पाहात होता. आतल्या आत कुढत होता.

रामनं बी.एड. प्रवेशाची जाहिरात वाचली. हे बी.एड. कॉलेज एका शिक्षकानंच काढलं होतं. तो रामचा हायस्कूलचा शिक्षक होता. रामला आशा वाटली. तो गेला आणि आपल्या शिक्षकाला भेटला. जी.डी. त्याचं नाव. सारी जी. डी. सर म्हणून संबोधित. रामला चांगले मार्क मिळाले तेव्हा साऱ्यांनी त्याचं कौतुक केलं होतं. त्यात जी. डी. ही होता. जी. डी. तसा पुढाऱ्यातनी वावरणारा. त्याला पुढाऱ्यांचा गुण लागला. पुढाऱ्यांच्या वशिल्यावर त्यानं बी. एड. कॉलेज मिळवलं होतं. राम जी. डी. ला भेटायला आतूर झाला होता. त्याला खात्री होती. राम त्या जी. डी. ला भेटायला गेला. साध्या घराचा बंगला झाला होता. दारात चारचाकी उभी होती. माणसं आदबीनं वागत होती. राम गेला तेव्हा जी. डी. कुठं तरी जाण्यासाठी चारचाकीत चढत होता. रामनं पायाला नमस्कार केला. जी. डी.नं त्याच्याकडं बघितलं न बघितलं केलं. तरीही राम म्हणाला,

''सर, सर...''

''काय बोल लवकर. आधीच उशीर झालाय मला.''

''मला बी. एड. ला प्रवेश हवाय.''

''तिथं ऑफिसमध्ये भेट.''

गाडी सुरू झाली. भुर्रकन् निघून गेली.

राम ऑफिसमध्ये गेला. तिथं फॉर्म घेताना जी. डी. चा माणूस म्हणाला.

''एक लाख भरले तरच प्रवेश...''

''मी सरांचा विद्यार्थी आहे.

त्यांना भेटा मग. पण पैसं भरावं लागतील. जागा संपत आल्यात.''

रामनं पुन्हा पुन्हा हेलपाटं घातलं. दोनदा तर बाहेरच कुठं तरी जी. डी. गेला होता. तिसऱ्या वेळी घरात असून बाहेर गेलेत म्हणून सांगितलं. राम बराच वेळ बाहेरच थांबला. नंतर जी. डी. बाहेर पडला तेव्हा राम भेटला.

''सर...''

''काय ?''

''प्रवेश हवा होता.''



''ऑफिसमध्ये भेटा. माझ्याकडं काही नाही प्रवेशातलं.''

''पण पैसे भरा म्हणतात दीड लाख. माझी परिस्थिती नाही.''

''मग शिकायचं नाही.''

राम तोंडात मारल्यासारखं गप्प गप्प झाला. त्याला वाटलं, म. गांधीजींच्या एकवस्त्र व्रताचं कौतुक करणारे हेच का सर ? कर्णाच्या दानाच्या औदार्याचं वर्णन करणारे हेच का सर ? कोणते सर खरे ?

रामनं वडिलांना सांगितलं. पोराची शिकण्याची जिद्द बघून आपली जमीन गहाण टाकली. प्रवेशाचे पैसे भरले. सारं घरदार दुसऱ्याच्या रोजगारावर राबू लागलं. राम शिकू लागला. बापाला वाटलं, पोरगा शिकला, नोकरीला लागला की सारं रीण फिटंल. असल्या धा जमिनी घेता येतील. रामवर भरवसा हाय माझा.

रामनं कशी तरी दोन वर्षे ढकलली. परीक्षा झाली. रामनं पहिला क्रमांक मिळवला. घरदार आनंदानं फुललं. विठोबा हरकला. कुईनं मिठमिरच्या ओवाळून तिकाटण्यावर जाळल्या. किसनाला लाकडाच्या गिरणीत कसली कसली सपनं दिसली. वैजू दादाचं कौतुक करू लागली. आईनं तोंडावरनं मायाभरला हात फिरवला तेव्हा राम म्हणाला,

''आई...''

''काय लेकरा ?''

''माझा पहिला नंबर आलाय. आता कुठंबी नोकरी मिळंल. आता तू राबायचं नाहीस. नुसतं घर सांभाळून राहायचंस. आणिक वैजूच्या लग्नाची काळजी करू नको. मी पाहीन सारं.'' आईला केवढा आनंद झाला. चिंतुन्नाचं सपान पुरं होत निघालं होतं.

हायस्कूलच्या जाहिराती निघू लागल्या. रामनं अर्ज केले. एक-दोन ठिकाणी तर मुलाखतीला बोलावलंही नाही. एक-दोन ठिकाणी मुलाखती दिल्या. राम सरळ, भला पोर. त्याला समाजातले छक्केपंजे माहिती नव्हते. त्याला कळलं की पैसे घेऊन शिक्षक नेमले. तो हतबल झाला. काय करावं, आपल्याकडं तर पैसे नाहीत. आधीचंच कर्ज घरावर आहे. पैसे द्यायचे तर मग पहिला नंबर मिळवून काय उपयोग? आपल्या वर्गातल्याच कमी मार्क मिळालेल्यांनी पैसे भरून नोकऱ्या मिळवल्या होत्या. रामला धक्का बसला. तो अशा प्रकारानं नोकरी मिळवलेल्या आपल्या एका मित्राला भेटला. मित्र म्हणाला,

''तुझ्यासारखं जग राहिलेलं नाही. पैशावर नाचणारं जग आहे. पैसा असला की राजाची राणीही मिळते. आहेस कुठं ? मी पैसे दिलं. माझ्या बानं जमीन विकली. दिलं पैसं. एकदा पगार मिळत गेला की पैसं फिटतील. लाख उलाढाली करता येतील. जमीन पोटाशी धरून बसली की लागंल नोकरी ? मिळंल पगार ? कुठलं पैसं मग ?''

रामला ते पटत नव्हतं. त्याचा आपल्या गुणवत्तेवर विश्वास होता. पण त्या मित्राचं बोल ऐकल्यावर तो विश्वास ढासळला. मित्राचं म्हणणं रामला पटत गेलं.

रामनं खरं वास्तव चिंतुन्नाला सांगितलं. त्याची कंबर बसली. विठोबा हताश झाला. कुईच्या डोळ्यापुढं गहाण टाकलेली जमीन नाचू लागली.

चिंतुन्नानं आपल्या वाट्याची जमीन गहाण टाकून रामच्या शिक्षणासाठी पैसं पेरलं. आता हे संकट. नोकरीसाठी एवढं शिकूनही, एवढा पैसा खर्च करूनही हाती काही नव्हते. चिंतुन्नाला चिंता डसून राहिली. शिक्षण पुरं झालं की पोराला नोकरी लागंल. गहाण जमीन सोडवता येईल असं चिंतुन्नाला वाटलं होतं. रामचीही तशीच समजूत होती. पण आता...

नोकरी लागल्याशिवाय पैसं मिळणार नव्हतं. गहाण जमीन सोडवता येणार नव्हती. रीणानं रीण वाढतच जाणार होतं.

चिंतुन्ना चिंतातूर झाला. विठोबानं हे जाणलं. घर संकटात आहे हे पाहून तो भावाला म्हणाला,

''दादा, अर्धी जमीन राहिलीय ती विकून टाक. रामच्या नोकरीला भर. नोकरी लागली की आपसूक घरदार चालंल. म्या तुला शपथ देतो. नाही तर पोर हातचा जाईल.

विठोबानं हेका धरला. रामची काळजी बघून चिंतुन्ना तयार झाला. चिंतुन्ना खरेदीचा कागद करायला गेला. दस्तावर आंगठा उठवताना त्याचं हुर्दं भरून आलं.

पैसं भरल्यावर एका पुढाऱ्याच्या बापाच्या नावावर असलेल्या हायस्कूलवर नोकरी लागली. नोकरीची अट होती, एक वर्ष फुकट नोकरी करायची. पुढं अर्धा पगार घेऊन पूर्ण पगारावर सही करायची. रामनं मान्य केलं होतं. त्याला आशा होती, एक-दोन वर्षांनी पूर्ण पगार मिळंल. कर्ज फिटंल. घराचं दिवस पालटतील. तो



पदरचं खाऊन फुकट नोकरी करीत होता. रात्र रात्र त्याच्या डोळ्यापुढं घराचं हलाखीचं चित्र नाचत होतं. कर्जाचं ओझं डोळ्यापुढनं हलत नव्हतं. पदरची जमीन राहिली नव्हती. सारं घर दुसऱ्याच्यात राबत होतं.

याच काळात नको ते घडलं. ज्यानं गहाणवट जमीन घेतली होती, तो अचानक चिंतुन्नाच्या दारात उभा राहिला. म्हणाला,

''गहाणवटाची मुदत संपलीय.''

चिंतुन्ना गोंधळून गेला. म्हणाला,

''म्हंजी काय म्हणताय ?''

''मुदत गहाणची मुदत संपलीय.''

''संपेना. वाढवून घ्यायची. आता पोरगं लागलंय नोकरीला. फेडू एक-दोन वर्षात.''

''कुठल्या सपनात आहेस चिंतुन्ना.''

''का ?''

''गहाणवटात असं लिहिलंय... समजत नसंल तर वाचून दाखवतो. या दस्तात असलेल्या मुदतीत जर भरले नाहीत तर हे गहाणखत म्हणजे रीतसर व कायदेशीर खरेदी खत होईल. बोल आता...''

''पण हे कधी लिवलं हुतं...?''

''लिहिलं होतं. पण तुला ते आठवत नाही. आता या गहाणवटाप्रमाणं तुझी जमीन कायमचीच माझी झालीय.''

चिंतुन्नाला चक्कर आली. कुईचं काळीज हाललं. सारं घरदार अंधारून गेलं. रामला कळलं तेव्हा फास लावून घ्यावा असं झालं त्याला.

त्यानं हे सारं दु:ख गिळून कसं तरी वर्ष ढकललं.

रामनं उपाशीपोटी राहून कसंतरी एक वर्ष काढलं. शिकवण्यात रमायचा न् पोटातली भूक विसरून जायचा. मुलांचा आवडता शिक्षक अशी भावना परिसरभर होती. त्याच्या विषयाचा निकालही उत्तम होता. या आनंदात राम सुट्टीत गावाकडं आला होता. या वर्षापासून अर्धा पगार मिळणार या खुशीत होता. एक दिवस संस्थेच्या शिक्क्याचं पत्र आलं. मोठ्या उत्सुकतेनं रामनं लखोटा फोडला. पत्र वाचत गेला आणि त्याला घेरी आली.

पत्रात लिहिलं होतं,